


म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६७४
१९५७

# जेड

विनोदी सामाजिक कविता संग्रह

REFBK-0010575
REFBK-0010575

किंमत १२ आणे

सहकारी काव्य प्रकाशन

१७५८५
स. शा.
काव्य
१६८०

# उजेड

विनोदी सामाजिक कविता संग्रह

नव्या युगाचे प्रेषित आम्ही,
पूजक मानवतेचे,
निजरक्तानें लिहूं निरामय
मंगल भाष्य उद्यांचें ! ”

—वैनतेय

REFBK-0010575
REFBK-0010575

अरुणप्रभा
पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९५५५

१९५९

किंमत १२ आणे

प्रकाशक :
रंगनाथ नरहर होनप
संचालक अरुणप्रभा
१९८।२ सदाशिव, पुणें २.

★

मुद्रक :
वि. भि. गोरे,
नन्द मुद्रणालय,
१००८ सदाशिव, पुणें २.

# निवेदन

बऱ्याच दिवसांनीं आपल्या भेटीचा योग येत आहे ! सन १९५४ पासून विनोदी कवितासंग्रह प्रसिद्ध होणार म्हणून अनेक वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून वार्ता फडकविल्या कवींनींहि हीरीरीनें आपल्या कविता वेळेवर पाटविण्याची पराकाष्ठा केली. परंतु नकटीच्या लग्नाला या म्हणीप्रमाणेंच या संग्रहाचा 'उजेड' पडला ! ज्या वृत्तपत्राचा विनोदी कविता छापणारें प्रसिद्ध वृत्तपत्र म्हणून गौरव केला जातो. त्या विबिधवृत्त या सप्ताहिकांचे भूतपूर्व व 'आलमगीर'चा नवीन वृत्तपत्राचे वर्तमानकालीन संपादक श्री. च. वि. बावडेकर यांची १९५५ सालीं त्यांची मी समक्ष गांठ घेतांच वृत्त छापलें व श्री. सदाशिव आठवले याजसारखें विविधवृत्ताचे प्रसिद्ध विनोदी कवि त्वरित साह्य करण्यास पुढें सरसावले परंतु पाठीमागचें दुर्दैव संपेना. संस्थेचीं पुस्तकें वेळेंवर छापून देणारें इंदिरा प्रेसचे व्यवस्थापक प्रा. ज. शं. मेढेकर हे अकालीं निधनामुळें तो प्रेस बंद पडला कवींचीं हस्तलिखितें व मुद्रितें धूळ खात तिथेंच पडून राहिलीं. त्यांची मुक्तता करण्याचा कसून प्रयत्न केला. परंतु तीं जागचीं हलेनातच! त्यांना प्रा. मेढेकर यांच्याबरोबर तिथेंच गतप्राण व्हावें लागलें. मग पुन्हां कवींना त्या कवितांच्या हस्तलिखितांना पुनर्जन्म देण्यास सांगितलें ! अगोदर पत्रें पाठवून तें मेटाकुटीला आलेच होते. परंतु म्हटले अजुनहि त्यांच्यांत हस्त-लिखितें पाठविण्याच्या स्फूर्तीची प्रसूति क्षमता असेल तर पहावी आणि काय आश्चर्य! ती शिल्लक होती म्हणूनच निभावलें! कवितेचीं हस्तलिखित पुन्हा घरांत येऊन पडली नाहींतर संचालकांचाच 'उजेड' पडून त्याची इतिश्री होण्याची पाळी यावयाची ! म्हटलें अजूनहि संचालकांत जीव आहे. परमेश्यराच्या कृपेनें पुन्हा वार्ता प्रकट होतांच आणखीहि अनेक कवि साह्य करण्यास धावून आलें ही आनंदाची गोष्ट आहे. या संग्रहाला आचार्य प्र. के. अत्रे यांची प्रस्तावना घेण्याचा प्रयत्न केला होता व त्यांनीं १९५५ सालीं मीं मुंबईस त्यांना समक्ष भेटलों असतां त्यांनीं त्यास संमतिहि दिली होती. परंतु माशील

अनुभवामुळें त्यांचीं प्रस्तावना वेळेवर मिळेंलच अशी खात्री देतां येत नव्हती व सयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत तें गुतलें असल्यामुळे मराठा दैनिक व नवयुग सप्ताहिक यांचा वाढता व्याप पाहुन हें कार्य त्वरित होईल असें मुळीच वाटले नव्हतें आतां त्यांना हें पुस्तक त्यांच्या एकसष्टीनिमित्त अर्पण करण्यास त्यांची संमति मिळाली हेंच परम भाग्य समजलें पाहिजे ! त्यांच्याऐवजीं ज्याच्या दोन विनोदी कवितांच्या पुस्तकांना आचार्य अत्रे यांची प्रस्तावना लाभली ते श्री चं. ग. दीक्षित बी. ए. हे या पुस्तकाला प्रस्तावनाकार म्हणून लाभत आहेत. त्याचें लिखाण सध्या प्रसिद्ध होत नसले तरी त्यांच्या लेखनशैलीचा परिचय संचालकाला फार पूर्वीपासून आहे. त्यामुळें त्यानी या पुस्तकांतील कवीचा घेतलेला समाचार रसिकाच्या अभिरुचीला खमंग वाटेल यात शंक नाहीं ! यापेक्षां अधिक सांगणें न लगे ! महागाईचे दिवस आहेत ! तरी अजूनही संचालकांची उमेद कवि खंबीर स्वरूपात राखीत आसल्यास यापेक्षा अधिक भरघोस संग्रह प्रसिद्ध होतील ही प्रखर आशा मनात वास केल्यावाचून रहात नाहीं. या संग्रहांतील कविता निवडण्याच्या कामी खुद्द प्रस्तावनकार व उपहासिनी या प्रतिनिधिक विढंबन काव्य संग्रहाचे संपादक श्री. दि. वि. देव यांनीं मनःपूर्वक साह्य केलें याबद्दल त्यांना हार्दिक धन्यवाद !

तसेंच मौज व साहित्य सहकार यांनीं अनुक्रमें मागील पुस्तकांतील निवेदन व संस्थेचा माहितीपूर्ण लेख छापल्याबद्दल संचालक त्यांचा अत्यंत ऋणी आहे. कै. प्रा. ग. भा. निरंतर, एम्-ए. हेहि नुकतेच आपल्यांतून निघून गेले आहेत. यांनीं मागील पुस्तकांच्या प्रकाशन समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारल्याबद्दल राजकवि यशवन्त व लोककवि मनमोहन यांनीं दोन अनौपचारिक बैठकीचें नेतृत्व स्वीकारल्याबद्दल व श्री. वि. भि. गोरे, मॅनेजर, नंद मुद्रणालय यांनीं छपाईचें काम सुबक व त्वरित करुन दिल्याबद्दल त्यांचेहि प्रेमादरपूर्वक आभार मानतो !

सर्वांचा नम्र
रंगनाथ नरहर होनप
संचालक

क्रमांक ........ नों: दि

सुप्रसिद्ध विनोदी लेखक

व

विडंबनकार

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे,

बी. ए., बी. टी., टी. डी. (लंडन)

यांच्या बासष्टाव्या वाढ दिवसानिमित्त

सविनय समर्पण

— रंगनाथ

# अंधारांत—

वस्तुत: ‘ उजेडा ’ ला प्रस्तावनची जरुरी नाहीं. पण, चित्रपट पहातांना स्वत: ‘ अंधारां ’ त बसून ‘ उजेडा ’ कडे पाहण्याचा दृष्टीला सराव द्यावा लागतो, त्यांतलाच हाही प्रकार होय !

पुरातन कालापासून आजतागायत अनेक प्रकारांनीं ‘ उजेड ’ पाडण्यांत आलेले आहेत. अगदीं भारतीय संस्कृतीच्या निरांजनापासून आधुनिक मर्क्युरी दिव्यापर्यंत ‘ उजेडा ’च्या बाबतींत प्रकार आढळून येतात. ‘ दिव्याखालचा अंधार ’ नाहींसा होऊन ‘ दिव्यावर अंधार ’ प्रस्थापित झाला आहे, परंतु जापर्यंत खगोलांत चंद्र–सूर्य भ्रमण करीत राहतील तोंपर्यंत नैसर्गिक ‘ उजेडां ’ त कोणताच बदल होणार नाहीं.

शरदाच्या शर्वरींत प्राणिमात्रांच्या भावना धुंद करणाऱ्या प्रकाशाची जी जादू आहे ती मर्क्युरी दिव्याच्या प्रकाशांत कोठून आढळणार? कृत्रिम आणि नैसर्गिक ‘उजेडा’ बाबत हा जो भेद दिसून येतो तशीच तफावत कृत्रिम व नैसर्गिक काव्यांत दिसून येते.

या संग्रहांत अनेक कविकवयित्रींनीं आपआपल्या काव्याचा त्यांच्या कुवतीप्रमाणें कमी-अधिक 'उजेड' पाडला आहे. यांतील कांहींचा उजेड इतका लख्ख आहे कीं, डोळे मिटूनच घ्यावे लागतात; तर कांहींचा इतका मिणमिणता आहे कीं तो पहाण्यासाठीं दुसऱ्या 'उजेडा' ची जरुरी भासते.

जुन्या पुण्यांत स्थानिक स्वराज्याचे घासलेटचे दिवे इतके अंधुक लावलेले असत कीं ते पाहण्यासाठीं घरचा कंदील रस्त्यानें जातांन न्यावा लागे !

विनोदी कवितांचा सामुदायिक संग्रह काढण्याची घोषणा करून संचालकांनीं विनोदी म्हणून ज्या कविता घेतल्या आहेत, त्यांतील फारच थोड्या विनोद निर्माण करतात. इतर सटरफटरांत पोरकट हास्यास्पदताच जास्त आहे.

काव्याची भरारी मारण्याचा आवेश आणणाऱ्याची झेंप कुंपणापलीकडे सुद्धां जात नाहीं याची साक्ष त्याच कवीनें स्वतःच्या सुभाषितांत दिली आहे कीं—" तरी लिहिणें थांबेना, मूळ स्वभाव जाईना " !

श्रीकृष्णाच्या वंशांतील वारसाचा दाखला हजर करून बरीच लेखणी हाताळली आहे अशा एका कविराजांनीं तर "सौ. ला शिवायचें नव्हतें" असें पाहून 'शेजारधर्म' पाळतांना स्वतःच्या गालांवर जो हस्तकौशल्याचा नमुना नोंदवून घेतला, त्याचेंच वर्णन गाल चोळींत केलेलें दिसतें ?

सदाशिवरावभाऊंना म्हणे, काव्य आठवलें, पण केव्हां ? "एवढी कविता

केली कशितरी, गेलेली पाहून देवता माहेरीं " ! म्हणजे हा वायकोला भिऊन चोरून काव्य करणारा कवि, चोरून शौचकूपांत विडया ओढणाऱ्या वर्गांतलाच असावा. चतकोर काव्य पचविण्याची ज्याच्यात ताकद नाहीं तो अखंड खंडकाव्य काय खाणार ? तें लिहावें लागलें तर त्याला प्रथम घटस्फोटच घ्यावा लागेल !

नवकवींच्या वाटेस जातांना कवि घोलप म्हणतात, "धरून वा तुम्हांस खुशाल 'लिंगायती' ते करतील." ते म्हणजे कोण ? तर नवकवी ! काय करतील ? तर धरून आम्हांला खुशाल 'लिंगायती' करतील यात लिंगायती म्हणजे काय याचाच उलगडा होत नाहीं. कवीनें लिंगायती हा शब्द अवतरणांत कोंबल्यामुळें तो दुसऱ्या कोणा नवकवीचा म्हणून उद्धृत केला आहे किंवा कसें तें कळत नाहीं. बारा ज्योतिर्लिंगाव्यतिरिक्त आणखी एखादें विशिष्ट लिंग कवीला दर्शवावयाचें आहे कीं कसें तेंही न कळे ! कीं, नवकवी लिंगभेद मानीत नाहींत असें कांहीं तरी त्यांना म्हणावयाचें असल्यास, अगर नवकवींना नपुंसक ठरवावयाचें असल्यास न कळे ? कवितेचें शीर्षक आहे, "अरे आ ऽ ऽ ला ऽ ऽ" पुण्याच्या मंडईत एक पोळ व एक बोकड आहेत. हे मात्र अधून मधून उधळतात तेव्हां "अरे आला ! अरे आला !" अशी आरोळी मात्र उठते ! या अर्थानें घोलपांना नवकवीला पोळ वा बोकड म्हणावयाचें असल्यास वेगळे !

"गाढवांच्या राज्यांत लाथांचा सुकाळ" याची प्रचीति माधवरायांनीं

त्यांच्या कवितेंत चांगलींच आणून दिली आहे. 'गाढवानें पाय–जोरानें झाडला, गुडघा फुटला–बाळ्या बोंबलला!'

काळ्यांची 'खरी संपत्ति' कवडी कवडी सांठवून संचय केलेली कवडीमोल वाटते. एका उत्कृष्ट कवितेची उधार उसनवारी करून त्यांनीं जो विडंबनात्मक पर्याय पुढें ठेवला आहे, कीं या कवींना सरळ सरळच सांगावेसें वाटतें कीं 'येरा गबाळाचें काम नोहे.'

एका पट्टेबापूंनीं तर परमेश्वरालाच, 'तूं वेळींच संततिनियमन कां केलें नाहींस?' म्हणून ठपका दिला आहे. पृथ्वीवरील सर्व लेकरें परमेश्वरांचींच, 'एक ना धड, भाराभर चिंध्या' अशी त्यांची दैन्यावस्था पाहून, कवीला ही कल्पना सुचली. बरें तर बरें! या पट्ठयानें स्वतःजवळची कांहीं 'साधन-सामुग्री' परमेश्वराला देऊं केली नाहीं!

येणेंप्रमाणें या संग्रहांतील बऱ्याच कवि–कवयित्रींचा काव्यविलास 'मोर नाचतो म्हणून लांडोर नाचते' या प्रकारांतला असला तरी कांहींच्या कवितांतील कल्पना, भाषा व रचना बरीचशी हृद्य, नाविन्यानें नटलेली व विनोदाचा वास दिलेली आढळते. बाशिंगांतली बेगड दिखाऊ असते पण टिकाऊ नसते.

उंब्रजकरांनीं एस्. टी. मोटार नेमकी कशी विश्वासघात करते, ते यथार्थच वर्णिलें आहे. ठेकेदारांनीं 'कोणाचे तरि कल्पुनि अवयव, वर्णन करितां तुम्हि अवास्तव.......भलतें सलतें असलें लिहितां, लोक तयाला

म्हणती कविता ' अशी मस्त मेनकेची रोमांचकारी तक्रार गुदरली आहे घोलपांनीं अलिकडच्या इटुकल्या मिटुकल्या 'किंचित् काव्याला केसांतल्या उवांची मोठी खोचक अशी उपमा दिली आहे ती सार्थच नव्हे काय ? मराठी साहित्यांतील शारदाबाईंचेंही असलीं काव्यें डोकें खातात. सौ. सोहोनींनीं ' संसारचित्र ' रंगवितांना, ' काय हा संसार ! फापट पसारा, झालों बेजार, पण–याला माझा मीच नाहीं कां जबाबदार ? अशा स्पष्ट कबुली मोठ्या मार्मिकतेनें देऊन अखेर हातच टेकले आहेत. याच बाईंना " मूळ स्वभाव जाईल कसा ! " ही कविता फारच उत्तम साधली आहे. खुद्द संचालकांच्या–श्रीयुत रंगनाथ होनपांच्या–नवकाव्यां-वरील ओव्या फारच खुसखुशीत, खमंग अळुवडीप्रमाणें खाजऱ्या वाटतात. ' जात्यावर बसले किं ओवी सुचेत व न्हाणीघरांत गेलें कीं काव्य स्फुरतें ! ' अशांतलाच कांहींसा प्रकार नवकवींच्या बाबतींत होत आहे. चव्हाणांनीं प्रेमपत्राची वाट पहातां पहातां, एके दिवशीं अचानक लग्नाची निमंत्रण–पत्रिका पोस्टानें मिळाल्याचें सांगून चालू रेशनच्या जमान्यांतील प्रेमवीरांच्या पोरकटपणावर थोडक्यांत तोंडसुख घेतलें आहे.

माधवनगर व श्रीरामपूरला सामुदायिक लग्नें लागल्याचें ऐकिलें आहे, नारदमंदिरात सामुदायिक मुंजी लावल्याचें कळलें आहे. केडगांवला सामुदायिक सत्यनारायण गाजल्याचें समजलें आहे. महिलामंडळांतून सामुदायिक रीत्या हळदी कुंकवाचे समारंभ साजरे झाल्याचें कानांवर

आहे, परंतु, सामुदायिकरीत्या निरनिराळ्या कवींनीं स्वतः पैसे देऊन आपआपल्या कविता एकत्र करून छापल्याचें मात्र हें मात्र प्रथमच पाहातों आहे.

सहकारी तत्त्वावर निरनिराळ्या नवीन कवींच्या कविता सामुदायिक रित्या एकत्रित करून "सहकारी काव्य प्रकाशन" या संस्थेमार्फत कलेची जोपासना करण्याची योजना श्रीयुत रंगनाथ होनपांनीं (कवि बगाराम-अत्रे उवाच) सुमोरे सातवर्षांपूर्वीं जी पुरस्कृत केली, त्याचा आढावा आज त्यांनीं घेतला असतां त्यांच्या वाट्यांस काय आलें? कष्ट व कुचेष्टा! अंधारांतील कवींच्या काव्यगुणांना 'उजेडां'त आणून वाङ्मयांत त्यांना वाव द्यावा या साहित्य हेतूनें त्यांनीं आजपर्यंत तीन काव्यसंग्रह प्रकाशित केले.

सहकारी तत्त्वावर साखर कारखानें उत्तम चालतात, कारण फायद्याच्या दृष्टीनें त्यांतील सहकाऱ्यांच्या तोंडांत अखेर साखर पडते. परंतु अशा या तत्त्वावर काढलेल्या काव्यसंग्रहांतील प्रत्येक कवीला आपल्या स्वतःच्या पैशानें प्रकाशांत येण्याची संधी मिळत असली तरी संचालकांच्या पदरांत चुकून काय पडेल तें त्याचें त्यालाच माहित! नोकरी करून फावल्या वेळांत स्वतःचा खिसा खाली करून, कधी प्रस्तावनाकार तर कधी मुद्रक, यांचेकडे कधीं कवी तर कवींच्याकडून येणें असलेली उग्राणी वसूल करण्यासाठीं वेळीं अवेळीं पदयात्रा करून खुद्द होनपांची स्थिति मात्र अक्षरशः अनवाणी झालेली आहे. त्यांना अनेक जण म्हणतात कीं हा

'अव्यापारेषु व्यापार' तुम्ही कां करतां? परंतु माझ्या समजुतीनें त्यांचा पिंड कवीचा आहे काव्य हा त्यांचा कौतुकाचा विषय आहे आणि म्हणूनच असेच प्रयत्न करीत राहिल्यास यांतूनच कांहीं तरी उत्तम असें 'उजेडां'त येईल अशी त्यांना उमेद आहे. कवी करोत आणि ती सफल होवो. कवि बगारामाचे व्यसन. तळिरामाच्या व्यसनाप्रमाणेंच सुटणें अशक्य!

पुणें दि. ३–६–१९५९ चं ग. दीक्षित

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. १०४५४
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# उजेड!

## नयीं सुभाषितें —

[ ' नयें राज्य ', ' नये पैसे ', ' नयीं वजनें मापें ', ' नया मनूचे नये शिपाई ' ' नये कवी नि त्यांच्या नया प्रतिमा ' यांच्या भाऊगर्दींत नयीं सुभाषितें घुसलीं नाहीत, तरच नवल ! पण त्यामुळें ' जुन्या ' सुभाषितांतील ' सोन्या ' ची किंमत कमी होते, असें कोणी समजूं नये. ]

( जुन्या संबंधित कवींची माफी मागून )

★

### (१) भित्यापाठीं ब्रह्मराक्षस

( जाति—खल्वाट चंडकिरणें अतितप्त झालीं )

ठावा विना-टिकिट त्या न कधीं प्रवास
एके दिनीं परि घडे अपघात त्यास
गेलें टिकीट पडुनी, कळलें न त्याला
साथीच चूक, परि दाखवि बंदिशाला ॥ १ ॥

मी दूरदृष्टि म्हणूनी बहु गर्व त्याला
केव्हां चुकून करि क्रॉसन रेलवेला
जाई जिन्यावरुनि, कीं न कधीं घडेल
धोका, जिना चढुनि हो परि हार्ट फेल ॥ २ ॥

## (२) दैवं चैवात्र पंचमम्

( जाति—लक्ष्मी जयासि भगिनी अणि तात सिंधू )

पंत-प्रधान चि जयास असे श्वशूर
भार्या गव्हर्नर, नि शालक शुभ्र चोर
ऐसा असोनि वशिला, न मिळे तयाला
कॉन्ट्रॅक्ट, दैवहत का न म्हणो कशाला ? ॥ ३ ॥

## (३) चढती भांजणी

( जाति—आधीच मर्कट तशांतहि मद्य प्याला )

आधींच शेण, वरि त्यावर केळ-साल
पायांत शू असति ज्यांसहि रबूरी सोल
चाले तयावरुनि बावळट शुद्ध कोणी
त्याचें कसें पतन वर्णु शकेल वाणी ! ॥ ४ ॥

## (४) भर्ताऽन्योक्ति

( तिचा व्हावें चाकर, पण होऊं नये नवरा ! )

व्हावें चाकर, मेहुणादि, अथवा कुत्रा कुलुंगा तिचा
यावा योग परी कदा न नशिबीं भर्ता तिचा व्हायचा

एका गोड हुकूम, कौतुक दुज्या, पापा नि ज्याला मिळे
सारी धुसफुस राग, येउनि परी भर्त्यावरी आदळे ॥५॥

## (५) ही पोस्ट खातें–द्या !

( जाति—डोळ्यांनीं बघतों, ध्वनी परिसितो कानीं पदीं चालतो )
डोळे लावुनि बैसतो, दचकतो, आलाच तो भासतो
पैं दिसतां भलता, निराश बनतो, जेव्हां ठरे भास तो
एखादें खत सात साल फिरतें तो जाय टाकुनियां
खाकी धारि चुकून पोष्टमन जैं, ही पोष्टखातें दया ॥ ६ ॥

## (६) मूळ स्वभाव जाईना !

( जाति—आधी होता वाघ्या। दैवयोगें झाला पाग्या )
आधीं होता संत्री, वशिल्यानें झाला मंत्री
त्याचें 'जी साब !' राहिना, मूळ स्वभाव जाईना
आधीं होता कथेकरी, झाला चुकून अधिकारी
त्यांचें 'जे हेत्ते' थांबेना, मूळ स्वभाव जाईना
आधीं होती नटी, आय. ए. एस. झाली बेटी
तिचें लचकणें विसरेना, मूळ स्वभाव जाईना
तुकयाचे अभंगासी, तुळितां न ये या काव्यासी
तरी लिहिणें थांबेना, मूळ स्वभाव जाईना ॥ ७ ॥

—काव्यभरारी

★

# विश्वासघात!

( जाति—मोहिनी )

कोठवरी वाट सखे गे मी तुझी पहावी ।
परी मुखहि दावायाची आस तुज नसावी ॥ ध्रु. ॥
येथ येउनीया मजला काळ किती झाला ।
आठवितां येशिल गमलें खचित भेटण्याला ।
निराशाच पुरती पदरीं हाय परी यावी ॥ कोठ० ॥१॥
तुझ्यावरी विश्वासूनी येइ या स्थळाला ।
घात परी विश्वासाचा साच तुवां केला ।
तिळहि खत त्याची तूंतें कां परी नसावी ?॥कोठ० ॥२॥
भेट तुझी नाहीं म्हणुनी किती दुःख होई ।
काय परी त्याची तुजला कल्पनाहि नाहीं ।
कां वृथा दुज्यास्तव कोणी काळजी वहावी ? ॥ कोठ० ॥३॥
नको मुळीं स्त्रीजातीचा संग अविश्वासी ।
बाह्य दिमाखाला भुलुनी सदा लुब्ध होसी ।
कधीं स्वभावाची यांच्या परिक्षा कळावी ? ॥कोठ०॥४॥

× × ×

वाट अशी मोटारीची पाहुनी अखेर ।
निघे तदां निज चरणानें जाहला उशीर ।
एकटाच अपरात्रीला येइ दमुनि गांवीं ॥ कोठ० ॥ ५ ॥

कऱ्हाड —विष्णुसुत उंब्रजकर

★

# अध्यक्षांची वाण

(जाति—पादाकुलक)

श्रीयुत .... यांचें होतें भाषण
'मद्यप्राशननिषेध' यावर
अध्यक्षांच्या मिळवणुकीचा
बोजा होता थोर शिरावर

शहर पालथें घालूनहि पण
सभाध्यक्ष कोणीच मिळेना
अध्यक्षाचा धंदा तेहि
हालविती आडव्याच माना

व्यवस्थापकांमध्यें होती
अननुभवी अन् तरुण मंडळी
'सत्कार्याला विघ्नें शतशत'
असें म्हणुनिया विमूढ बनली

ठांसून भाषण व्हाया 'श्रीयुत'
ठांसुन येती चिकार दारू
हीच तयांची अडचण दिसली
कोणाला न ये निवारूं

दुर्गंधीचा अन् भपकारा
दहा हात पसरे भंवतालीं
अध्यक्षांनीं दीड तासभर
सहन करावा कसा मंडळीं

'नाचवितांना करास वक्ता । प्रसाद गालावरती उमटे'
अध्यक्षत्वाचा हा असला । मान हवासा कुणास वाटे !
शिवाय आवेशानें भाषण । निशेंत बेछुट चालत असतां
वक्ता खालीं कोसळेलही । प्रसंग आणिल भलतासलता !!

पूणें — म. भि. कुलकर्णी

★

## सिगरेट मी सोडिली !

सिगरेट मी सोडिली
भीतीनें ना कुणाच्याहीं
बायकोच्या शपथेला
भीक घालीत मी नाहीं !

सिगरेट मी सोडिली
नाहीं छातीची तक्रार
सुखें ओढिली असती
जळो ! खाक होवो ऊर !

सिगरेट मी सोडिली
काय पैसे वांचवाया ?
छे, छे ! अहो तयार मी
दिवाळेंहि वाजवाया !!

सिगरेट मी सोडिली
व्यसन तें म्हणून का ?
अंऽहंऽ ! कधीं येत नाहीं
जरासुद्धां मनीं शंका

सिगरेट मी सोडिली
त्याचें कारण निराळें
ओडणारांनो ! तुम्हांला—
काय सांगावें आगळें ?

पाकीटावरती माझ्या
झुंजती ते फुकट्ये भले
जिरविण्यासाठीं त्यांची
धूम्रपान मीं सोडिलें

कोल्हापूर

सदाशिव आठवले.

★

# शिवायचे नव्हते !

शिवायचें नव्हतें मम सौ. ला
गेली होती धुया नदीला
बसलों होतों चुलीजवळ मी
घेऊन वेळी दुध्या भोपळा
चिरतां चिरतां बोट कांपलें
ओरडलों मी रक्त पाहुनी
तों शेजारिण धावुन आली
बांधु लागली पट्टी वरुनी
मृदु नाजुकशा करस्पर्शानें
गोड झिणझिण्या छेडिति हृदया
धुंद जाहलों ! हात पकडतां
पुरी खवळली आदीमाया
श्रीमुखामध्यें भडकावुन ती
चपलावेगें निघुनी गेली
कपोल चोळित हळु वर बघतां
उंबरठ्यावरती सौ. दिसली !

पाबळ —श्रीकृष्ण राज

★

## स्फूर्ति देवता --

लिहीत असे मी किरकोळ कथा
मधून मधून तशाही कविता। ॥ १ ॥
आवडायच्या त्या माझिया मित्रांना
( मित्रप्रेम त्यांचें केवळ तें माना ! ) ॥ २ ॥
सोबती म्हणाले, दोस्ता साहित्तिका
दवडूं नको रें बुद्धि तुझी फुका ॥ ३ ॥
याहून पुष्कळ याहून सुंदर
वाङमय लिहावें तुवां भराभर ॥ ४ ॥
आणि त्यासाठीं बा हवें स्फूर्तिस्थान
मिळेल तें तुला विवाह करून ॥ ५ ॥
वल्लभेच्या संगे जीवन फुलेल
प्रतिभा ती तुझी धो धो बरसेल ॥ ६ ॥
सोबत्यांचा सल्ला बरासा वाटला
मोठ्या उत्साहानें संसार मांडला ॥ ७ ॥
या माझ्या दोस्तांनो ! या सारे धावून
स्फूर्ति अन् साहित्य घ्या सारें पाहून। ॥ ८ ॥
सकाळीं प्रियेचा चाले स्वयंपाक
आम्हीं हाताखालीं ' असिस्टंट क्लार्क ' ॥ ९ ॥
किराणा सामान, भाजीपाला कांदा
वाहून आणतों नवरा मी गद्धा ! ॥ १० ॥
' उंच ठेवलेला डबा द्या काढून '
ऐकतां हुकूम जातों धास्तावून ॥ ११ ॥
मधेंच सांचतें मोरीमधें पाणी
काठी घालायला हवा घरधनी ॥ १२ ॥

मधेंच केव्हांही संपतें रॉकेल
डबा फोडायला नवऱ्याला कॉल ! ॥ १३ ॥
"अगदीं वेंधळी मी तरी किन ऽ ई
लिंबू सांगायाचें राहिलेंच बाई" ! ॥ १४ ॥
ऐकतां असलें मनांत चिडतो
मात्र पुन्हां नीट मंडईला जातो ॥ १५ ॥
यांतूनही वेळ थोडासा काढून
लिहून पाहतों अर्धं मुर्धं पान ॥ १६ ॥
तोंच ये आरोळी "काय हो लिहितां ?"
डोंबल आपलं उठा बघू आतां, ॥ १७ ॥
बघा बंबाकडे जळतो कोळसा
संसार अगदीं विसरतां कसा ? ॥ १८ ॥
उठतों बापुडा करतों नी स्नान
जातों ऑफिसला नंतर जेवून ॥ १९ ॥
जातों कचेरीला घरांत थकून
वेळ जातों तेथें केव्हांच निघून ॥ २० ॥
आणि संध्याकाळीं बघा बाजारांत
थाटामधें चाले आमची वरात ॥ २१ ॥
स्फूर्तिदेवतेच्या चालतों मागूनी
महिला-भांडारीं कापडदुकानीं ॥ २२ ॥
चंदेरी धारीचें डाळिंबी पातळ
धुंडितों त्यासाठीं आकाशपाताळ ॥ २३ ॥
आंकडे नी पिना लाल काळें गंध
पाहतांना झालीं दुकानेंच बंद ! ॥ २४ ॥
आतां रात्रीं तरी करावें लेखन
स्फूर्तिदेवतेच्या समोरीं बसून ॥ २५ ॥

अनुक्रम ३८८८३ उजेड १९७०
२६५५३

शक्य नाहीं तेंही रात्र वायां जाते !
कशी आणि काय ? विचारूं नका तें ! ॥ २६ ॥
दिन आणि रात्री रात्री आणि दिन
वाङमयावांचून जातात निघून ॥ २७ ॥
चालली हें माझी साहित्याची चिंता
स्फूर्तिदेवतेला कुठें त्याचा पत्ता? ॥ २८ ॥
उरावरी भार्या नको दुजा ध्यास
सूज्ञ नरें घ्यावा साहित्यसंन्यास ! ॥ २९ ॥
तिचिया स्फूर्तीनें वाङमप निर्मिति
—केवळ अशक्य आणूं नये चित्तीं ॥ ३० ॥
स्फूर्तीची देवता असतां घरांत
हेही काव्य माझं जाहलं नसतं ! ॥ ३१ ॥
एवढी कविता केली कशीतरी
गेलेली पाहून देवता माहेरीं ! ! ॥ ३२ ॥

कोल्हापूर —सदाशिव आठवले

★

## दुःखांत सुख !

( जाति–पादाकुलक )

विवाह ठरला संध्याकाळीं
हाय ! नोकरी सुटे सकाळीं
आणि बोलला हांसुन मज तो
"करूं कशाला उदास चर्या ?
मिळेल मजला सुंदर भार्या ! "

मुंबई —पुष्पविहारी

## परीक्षेनें गांजलेल्या विद्यार्थ्यांचें रडगाणें--

[ एकसारखा नापास होणारा विद्यार्थी अभ्यासावसानी म्हणत आहे-- ]

सदान्कदा मज टाकि परीक्षा ग्रासुनी पुरतेपणीं
गुदमरे जीव तया दडपणीं !
बाहेर धुमाकुळ दिवाळिची निस्तुळ,
लाविती फटाके उघड तिची चाहुल
चलबिचल अंतरीं करि मजला व्याकुळ,
परी परीक्षा काच सुटेना, बसला जो जखडुनी
जातसे जीव कसा दडपुनी !
येतां जो अवचित कुणी पाहुणी घरी
पोह्यास्तव पडतें मुसळ तियेच्या करीं
बाजूस सरे बुक नादें त्या क्षणभरीं
मागुति ये ही पुन्हां परीक्षा जागृति सरसावुनी
जातसे जीव कसा दडपुनी !
ज्या टिपणि हव्या त्या घेतों सत्कारुनी,
काढितों तयातें रात्रंदिन घोटुनी,
ओपितील कीं मज त्या यश हें जाणुनी
परी परीक्षा अपेश पदरीं पडे अंति हटकुनी
जातसे जीव कसा करपुनी !
मी स्वतःच असुनी अभ्यासी हावरा,

---

कविवर्य यशवंतांच्या विहिरीनें गायिलेल्या निगूट गीतांतूनच विद्यार्थ्यांच्या रडगाण्याचे सूर निघतांना ऐकूं येणार नाहींत का ?

दुर्दैव वाहणें नापासाची धुरा,
ही परीक्षका ! नयनीति तुझी निष्ठुरा !
का न निटु तुज खुपति सराटे तव जों विद्यांगणीं
केवि हा जीव सुटे दडपणी?

भोर — ना. म: भिडे.

## कां ता आ णि क वि ता !

पुरे करा या कविता लंपट
कविता तूमच्या माझें संकट !
कोणाचे तरि कल्पुनि अवयव
वर्णन करितां तुम्ही अवास्तव!
म्हणें ' नयन हे गहिरें भेदक
गाल गुलाबी, ओठहि मादक
उरोज उन्नत, बारिक कंबर
पुष्ट नितंबिनि, सुभगा सुंदर '
भलतेसलतें असलें लिहितां
लौक तयाला म्हणती कविता !
त्या कवितेंतिल मस्त मेनका
' मीच असें का ? ' वाटें रसिकां
साम्य किती मम वदनीं दिसतें
पडताळाया उत्सुक जन ते
आणिक मी जर कुठेंहि गेलें
कटाक्ष मारिति—चावट मेले !

सोलापूर —गंगाधर ठेकेदार,

★

## उदार देणगी ! ! !

अठ्ठेचाळिस सालीं झाली
महान क्रान्ति हिन्दुस्तानीं
छोटीं छोटीं संस्थानें तीं
विलीन झालीं हिंदुस्तानीं ।।

चांदाचें छोटें संस्थान
भारतामधीं झालें विलिन
सर्व खाजगी दौलत घेउन
राजा जाई चांदा सोडून ।।

अहो ! पहा राजाची दौलत
माणिक, मोत्यें, हिरे आणिक--
चार बंगले, वाडचा चार
शेती जंगम पसरे फार ।।

जनावरेंहि असती बहुत
गाई आणी घोडे कितिक
गजराजाची जोडी एक
पोसुनि झालेली जी मस्त ।।

दिवसामागुनी दिवस चालती
राजा खिन्न दिसे परि चित्तीं
कसा चालवूं खर्च असा कीं
विचार प्रतिदिनिं करी मानसीं ।।

एके दिवशीं प्रातःकालीं
एक गृहस्थहि खादीधारी
विनंती करी राजालाही
द्यावि देणगी फंडासाठीं ।।

राजा क्षणभर विचारा करी
कसें पोसूं मत्त गजांसी
दावुनि औदार्य मग देई
मत्त गजांची जोडि एकली ।।

श्रीपुर —श्रीकृष्ण भिडे

## (१) वाङमयीन उवा!

किंचित् काव्या काय वाङमयांत स्थान?
माजलें यावरी पंडितांत रण
कोणीं वदे कांहीं कोणीं वदे अन्य
होईना कोणाचें मत सर्व–मान्य
अवचित उठला श्रोता एक कोणी
आणिक वदला मिस्किल हांसुनी
"स्थान कोणतें हा प्रश्न काय बुवा?"
'किंचित् काव्यें होत काव्यांतल्या उवा'!!

## (२) अरे आऽलाऽ !

तो पहा नवकवी आला ये 'किंचित्–कवि' जोडीला
जा लपा आड बाजूला
धरुन वा तुम्हास खुशाल 'लिंगायति' ते करतील
मग म्हणाल पुरता भवला 'युग–प्रवंतकासह चेला' ! !

## (३) शंख

वाळूंत खेळतां खेळ मुलें
जमवित होते शंख शिंपले
वडिल–मंडळींमधुनी कोणी
हळुच म्हणाले मिस्किल हंसुनी
'बाळांनो शिंपलेच आणा !
शंखांची ना उणिव आपणा' !

## (४) गालावरलें गुपित

आशंकेनें, आश्चर्यानें
हळूंच पुशिलें सखीस त्यानें
"नाजुक गालीं गोऱ्यापान
गोंदविलें कीं काय विमान ?"
"छे ! छे ! दिधली थप्पड, घेतां चावा गालास"
'असेल तो चिकटला' वदे ती 'मेलेला डास' ! !

पुणें —म. स. घोलप,

# संसार-चित्र

सरकारी नोकरी, गांव माझें कऱ्हाड,
बदली झाली घेउन आलों बिऱ्हाड ॥ १ ॥
आहे मुंबईस माझा भाऊ,
जागा मिळेतोवर तिथेंच राहूं, ॥ २ ॥
ही म्हणाली, उतरलों तिथेंच
एका खोलींत खेचाखेच ॥ ३ ॥
रहावें कसें ? होता मला मोठा प्रश्न,
गोंद्रू, गंपू, गणू, बाळ, कृष्ण, ॥ ४ ॥
चंद्री, यमी, आम्ही दोघें
मेव्हणा मेव्हणीं, मुलें चौघें ॥ ५ ॥
जागा पहाणें होतें जरूर
शोधून आलों दूर-दूर ॥ ६ ॥
फोर्टपासून कर्जत गांव
चर्चगेट पासून गोरेगांव ॥ ७ ॥
वणवण फिरलों दुपारभर
शेवटीं मिळालें जुनाट घर ॥ ८ ॥
जागा मिळाली वरच्या आळीस
भाडें होतें रुपये चाळीस ॥ ९ ॥
दहा बाय दहाच्या खोल्या दोन
त्याला जोडून एक त्रिकोण ॥ १० ॥

पागडी भरून गांठलें घर
हिला सांगितलें , आवर भरभर ॥११॥

मेव्हणा – मेव्हणीला वाटलें बरें
कटकट मिटली झालें बरें ॥१२॥

सामान घेतलें, पोंवलों एकदांचा तिन्ही सांजा
बरोबर पोरें पत्नी संसाराचा होता झांजा ॥ १३ ॥

लोक जमले आंवतीं – भोंवतीं
सारा संसार न्याहळून पहाती ॥ १४ ॥

एकमेकांकडे टकमक पाहती
कोणीं म्हणती , "आली जिवती ॥ १५ ॥

एक कुणी बोलली चोंबडी,
"पोरें किती ! जशीं काय कोंबडीं! " ॥ १६ ॥

दुसरी बोललीं गोरी गोमटी,
पिल्लें किती ? शोभतेय भाटी ! ॥ १७ ॥

"अग्गोबाई ! पांच मुलगे, दोन पोरी,
धांवतायत पाठीं निव्वळ डुकरी" ॥ १८ ॥

काय हीं विशेषणें ! उगारणार होतों छत्री,
नशीब माझें , कुणी म्हणालें नाहीं कुत्री ! ॥ १९ ॥

सामान बघून हंसत होत्या–बोलत होत्या
संसाराचें वर्णन करून मोठ्यानें चर्चा करीत होत्या ॥ २० ॥

पोरेंबाळें काळीं मेळीं कुटुंब आहे गाडीभर
जुनाट सारा संसार आहे, सामान आहे लॉरीभर ॥ २१ ॥

काय वघतां , कसली चर्चा ? विचारतां झाली म्हातारी
सहानुभूतिनें ती म्हणाली , "विचारा ! " शब्द आले कानावरी ॥२२॥

पुढे जाऊन झटकन घराचें काढलें कुलूप,
बोलायचेंच नाहीं ठरवलें तोंडाला ततेंच लावलें कुलूप ॥ २३ ॥

लोकच ते ? काय हवें तें म्हणोत मला
गुपचुप यंत्रवत, लागलों स्वयंपाक करायला ॥ २४ ॥

जरा नाहीं कधीं विश्राम, नाहीं देवाचें नाम
संसाराचें जूं ओढतों सारा दिवस कामच काम ॥ २५ ॥

गजर लावुन पहाटे उठतों चार वाजतां
मुलांच्या आंघोळी, काम आवरून निघतों घरून सात वाजतां ॥ २६ ॥

लांब स्टेशन पायीं रपेट ऑफिस गांठतों नऊला
एक वेळ अर्धपोटीं, रात्रीं अंधार, घरीं जातों नऊला ॥ २७ ॥

महागाई, घरभाडें एकूण पगार दोनशें साठ
आला – गेला चहापाणी, नऊ तोंडांशीं असते गाठ ॥ २८ ॥

आवश्यक गरजा, मुलांचीं शिक्षणें भागणार कसें !
वय बावन, नको जीवन, वाटतें मला लागेल पिसें ॥ २९ ॥

सामान लावलें, चार दिवसांत सजवलें गृह,
आनंद कुठला ! हिच्यासाठीं शोधायचें होतें प्रसूतिगृह ॥ ३० ॥

प्रसूतिगृह शोधायला निघालों दुसऱ्याच दिवशीं
वाटेंत भेटली मला हिची लांबलांबची मावशी ॥ ३१ ॥

स्वस्तांत स्वस्त प्रसूतिगृह मला दाखविलें तिनें
भरून आलों रुपये एकशें वीस, साडेदहा आणे ॥ ३२ ॥

चार दिवशीं बाळंतपणाला पोंचवली हिला
"डॉक्टरनीं सांगितलें, दोन कन्या, एक पुत्र, झाला"      ॥ ३३ ॥
हाय, रे देवा ! काय हें देणें ? घरीं माझीं सात बाळें
अष्टपुत्रा, बांधला आशीर्वाद आठवी प्रसूति–झालें तिळें ॥ ३४ ॥
मोठीं मुलें मनांत म्हणतील, "काय म्हणावे बापाला?"
जबाबदारी वाढवलीत आमची खायला काळ भूला भार झाला॥ ३५ ॥
काय हा संसार ! फापट पसारा, झालों बेजार
पण – याला, माझा मीच नाहीं का जबाबदार ?      ॥ ३६ ॥
अतां वाटलें, पुढें तरीं शहाणें व्हावें
नि सरकारी कुटुंब – नियोजनाचें स्थान गाठावें      ॥ ३७ ॥

मुंबई                                सौ. कमलाबाई सोहनी.

## न्या या धी श–!

( पादाकुलक )

न्यायधिश तूं आणि मी तुला
न्याय मागतें प्रियतम अबला !
न्यायावांचुन मला अकारण
नको सजा देऊं फर्मावुन !

अपराधी मी कां तूं असशी
परी पुसावें कुणी कुणाशीं !
तुझी नि माझी पहिली वहिली
भेट अचानक इथेंच झाली !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७०५५
शाखा (स्थळ प्रत)

न कळत मी रे हृदय चोरिलें
तुझें परी ते तुला न कळलें !
गुन्हा खरा हा एकच घडला
शिक्षा त्याची देशी मजला !

परी अर्पिलीं प्रीत तुला मी
हृदयघटी जीं भरली नामी !
मुखत्यार तिचा उपभोगाया
तूंच एकला असशी रायां !

तूं मी जेव्हां एक होउनी
सहज गायिलीं जीवनगाणीं !
अस्फुट ओळी अनोळखी त्या
खुणा प्रीतिच्या उठल्या नव्हत्या !

× × ×

तुला वाटलें अजाणतेपणि
चोरी केली दो नयनांनीं
आणि पाठमोरा तूं होशी
माझ्यापासुन निघुनी जाशी

आतां आलें मीं तुजपाशीं
आज न्याय तुज मागायाशीं !
नको करूं मग सजा श्यामला
तुझीच म्हण रे ! एकदां मला !

शिरोडा सदानंद राम शिरोडकर

## जागा नाहीं !

जागा नाहीं जागा नाहीं
मानवतेला जागा नाहीं
जूनी असो वा असो नवी
गैरसोयिचीं किती जरी
मोटारीच्या तबेल्यांतहीं-जागेची टंचाई १
इमारत दिसे नवी बांधली
मालक म्हणतो "नाहीं खाली"
अपुरीं कामें जरी राहिलीं-आंत बिऱ्हाडें भरलीं २
"पहिला गेला भाडें थकवुनि
दोनशेंच ते द्यावे भरुनी
खुशाल लावा कुलुप आणुनी" मखलाशी चाले ही ३
जामातांना अट ही पहिली
असेल जागा तर घ्या मुलगी
जागेवांचुन लग्न कसें हो-जमेल सांगा तुम्ही ? ४
चार खणाला चाळिस रुपये
रात्रीं पाणी वरती येतें
परवडेल का तुम्हांला तें-निराशाच ये पदरी ५
रस्तारुंदी जागाबंदी
लागु नये गरिबांनीं नादीं
लग्न करा जर मिळेल दोन्ही जागा आणि मुलगी ६

पुणें

प. अ. शिरगोपीकर

# विरस—!

( चंद्रकांत )

कचपाशांतुन खालीं गळला गुलाब रस्त्यावरी
उचलुन वेडा रसीक कोणी लावी कोटावरीं!
काय फुलाचा गूण असे त्या . छाती त्याची फुगे
प्रेतकळा जाऊन मुखाची कळीं तयाची खुले !!

खीळ उघडुनी शीळ निघाली त्यच्या तोंडांतुन
'रतन' 'पतंगा' 'आवारांतिल गाई मधुगायन
पानांच्या जाऊन दुकानीं ढोंग करोनी बळें
आयन्यामाजीं रूप स्वतःचें पुन्हां पुन्हां न्याहळे !

नजर बावरी स्वैर अधाशीं फिरे सभोंतीं परी
पाहण्यास त्या मिळे सुंदरी कृष्णवर्ण गोंजिरीं
नयन बटाटे सुरेख चकणे बघे कुठें ना कळे
दंत-कवाळीं ओठापुढतीं नाक ठबोणे भलें !

गालावरतीं खळीं नव्हे तीं तळीं विखुरलेलीं
भालप्रदेशीं आठ्यांचीं अन् जाळीं विणलेलीं
पाहुन असलें रूप तिथेचें चरं होउनी मनीं
चटकन् घेई पाय काढता आंबट मुख करुनीं !

शिरोडा सदानंद राम शिरोडकर

## गर्दभनंदन

गाढवानें पाय-जोरानें झाडचा
गुडघा फुटला-बाळला बोंबलला
"काय गद्धचा होतें-गाढवाजवळी !"
खेकसले बाबा-बाळा ये भोंवळी
"गाढवावरतीं-निबंध लिहिण्या
मास्तरांनीं मज-म्हटलें शाहण्या
गाढव ते मेलें-घे ना पाठींवरी
निबंध मी आतां-लिहूं कसा तरी?"
"गाढवाच्या लेका-गाढव तूं खास !
शाळा सोड बघूं-नको तो अभ्यास"
गाढव विषय-निबंधलेखना
एवढें न कळे-गर्दभनंदना !"

मारुतिराव

सुरत

## हाय! हाय!

दोनशें तीस्‌चा करंट येतो
नसानसांतून वाहूं लागतो
तुला पाहतां दीप प्रीतिचा
हृदयीं अन् तो जळूं लागतो
त्याच प्रकाशीं न्याहळितां तुज
मम हृदयींचा फ्यूज हि उडतो
हाय्! हाय्!! अन् त्या अंधारीं
वायरमन अन् दूरच पळतो

--प्रभाकर पाध्ये

कल्याण

# आज माणूस दिसतो--

रोज पाहतों त्याला मी
खिन्न मुद्रेनें जातांना
नित्य एकटें बोलणें
डोकें तें खाजवीतांना --१
केस विसकटलेले
नाहीं पाडिलेला भांग
आणि दिसे कुठल्याशा
रोज विचारांत दंग--२
नित्य रस्त्याच्या कडेनें
जातांना तो पाहतो मी
'आहे विचित्र माणूस'
शब्द येती मुखांतूनी--३
आज परंतु कांहींसा
झाला बदल दिसतो
हांसु आहे गालांतच
आज 'माणूस' दिसतो--४
हो ! . . . आज तारीख पहिली
कळुनिया आलें मज
खिसा आज 'फुल्ल' त्याचा
मुखावर दिसे तेज ! --५

बेळगांव 'किनारा'

# या नांव नवकाव्य!

( ओव्या )

बोलूं नये तें बोलावें।
करूं नये तें करावें॥
लिहूं नये तें लिहावें।
या नांव नवकाव्य ! ॥ १ ॥
हुंगूं नये तें हुंगावें।
वर्णूं नये तें वर्णावें॥
विवरूं नये तें विवरावें।
या नांव नवकाव्य ॥ २ ॥
शोधूं नये तें शोधावें।
पाहूं नये तें पाहावें॥
सेवूं नये तें सेवावें।
या नांव नवकाव्ब ! ॥ ३ ॥
उघडूं नये ते उघडावें।
उकलूं नये तें उकलावें॥
दाखवूं नये तें दाखवावें।
या नांव नवकाव्य ! ॥ ४ ॥
दिसूं नये तें दिसावें।
कल्पुं नये तें कल्पावें॥
प्रगटूं नये तें प्रगटावें।
या नांव नवकाव्य ! ॥ ५ ॥

# सुधारणेची हाकाटी

सुधारणेच्या नांवावरतीं काय काय कृत्यें घडतीं
थोरपणा जगिं मिरवायातें साधन नामी ये हातीं ।। धृ० ।।
सुधारकांचा धर्म असे तो नीती ज्यामधिं लव नाहीं ।।
स्वैर वृत्तिला बाध न जीनें ती नीती नव यास हवी ।।१।।
'पवित्र हेतू पवित्र तत्त्वें' यांच्या मनिं नच कधिं येती
आचारा मग कोण बिचारी संकरकारक हीच स्थिती ।।२।।
सनातन्यांचे अंतरंग तें कुजकें म्हणुनी ओरडती ।।
अंतर्बाह्यीं सदा सुधारक वदा असती किति शुद्धमती ! ।।३।।
संततिनियमन स्वैराचारा प्रबंध कोणी घालुं शके ।।
सुधारकांचें ब्रीदवाक्य हें गमे जयां पावित्र्य फिकें ।।४।।
सनातनी ती म्हणुनि तयाला बंध नियमनें बहु असती ।।
सुधारकाला बंध कशाचा धांवे तन्मति स्वैरगती ।।५।।
सनातन्यांतिल व्यक्ति कदाचित गर्ह्य अतिशय कर्म करे ।।
म्हणुनि अनादि वंद्य धर्म तो निंद्य कसा वा त्याज्य ठरे ।।६।।
ढोंगि जनांचो तीं दुष्कर्मं पाहुनि येई किळस जरी ।।
सुधारकाच्या नव्या पिढीच्या वृत्तीला ती बहु प्यारी ।।७।।
धर्मबंधनें यमन मनाचें वाणीचें हो देहाचें ।।
सेवि वायुचें भजन प्रभूचें खंडन होई मोहाचें ।।८।।
अज्ञानाचें पटल विरोनी अंतरिं उगवे ज्ञानरवी ।।
वदनीं विलसे तेज सदाचें चित्तीं शांती ये बरवी ।।९।।
धर्म सनातन नेइ नराला आत्मोन्नतिच्या नगशिखरीं ।।
दुःखदरींतुन आणि वरतीं खर भवसागरि एक तरी ।।१०।।

सुधारकाला जाब रोकडा शांती सुख त्या कधि लाभे ? ॥
स्वैरवृत्तिनें दुःख चहुंकडे मन कां भग्नाशें क्षोभे ? ॥११॥
सुधारणा ती म्हणतां म्हणतां स्वैराचारी वृत्ति बळें ॥
तनुशांतीस्तव स्वार्थपरायण कार्यसाधु जणुं खळ बगळे ॥१२॥
जुनें जाळण्या पुरुनि टाकण्या प्रवृत्त तुम्ही जरि झाला ॥
नूतन तत्त्वें तुमचि जना कां देती शांती सुखबोला ॥१३॥
युद्ध सरेना. भीति नुरेना, पाठ शांतिचा वदनि खरा ॥
प्रेम मिळेना, लोभ सुटेना, होय वारु कां धुवुनि खरा ? ॥१४॥
पतिपत्नीचा कलह मिटेना, मुलें न मानिति पितृजनां ॥
गुरूजनां नच छात्र, विचारी बंधुभावना नसे कुणां ॥१५॥
शस्त्रवाढ ती करण्यासाठीं शांस्त्रज्ञाची होय गटी ॥
शांतीचा शुकपाठ गात ते रंगभूमीवर जशी नटी ॥१६॥
व्यसनकर्दमीं सर्व हि बुडती आदर नाहीं परस्परीं ॥
श्वानासम करि वेंच आयुचा उमग पडेना हृदंतरीं ॥१७॥
सान, थोर, बुध, मूढ, पुढारी, दरबारी ते अधिकारी ॥
वारयुवति नट नाटय वितरती, कोण वदे त्या अविचारी ॥१८॥
कार्यकुशलता, कार्यदक्षता, मृदुलसरलता, चित्ताची ॥
कार्यचिकाटी कधि न हकाटी करी अटाटीं कार्याची ॥१९॥
असा कोणि जर भाग्यवंत हो नेता भारत देशाचा ॥
शांति सौख्य सुज्ञान लाभतां करूंच हेवा स्वर्गांचा ! ॥२०॥

पुणें दा. गो. संगोराम

एवंच वंद्य तें निंदावें ।
वा निंद्य तें वंदावें ।।
सुश्लिष्टाचें अश्लील करावें ।
या नांव नवकाव्य ! ।। ६ ।।

पुणें — रंगनाथ

## काढितो पळच मग आतां !

विचकतांच दंताजींना
सासरला देहीं कांटा
पाहसी रोखुनी जेव्हां
शेपट्यास देतां झटका
बघुं नको कोळसे मागें
पडलें तरि वरतिच पाही
शोध कुण्या आफ्रिकिणीला
मी पांढरपेशा दीन
कर दया विनंती ऐक
कां नटवे ऐकत नाहीं ?

मिटले मी गप्‌कन डोळे
'दिल्' उरांत अन् धडधडले
गाळणाची माशी उडते
धैर्य जणूं माझें गळतें
मानेला देउनी बांक
दावुं नको बसकें नाक
माझ्यावरि कां गे रोख ?
नितीचा लई बिनचोख
सोड बये ! पिच्छा आतां
काढितो मीच पळ आतां

धुळें —निशिकान्त

# च णे–चु र मु रे

अति विसराळू बाबा अमुचे
मंडई करुनी असतां परतत
फरशीवरुनी पाय घसरुनी
पडले खालीं अस्ताव्यस्त
'केळाच्या ह्या सालीवरुनीं
घसरलि चप्पल' ते बडबडले
'केळी आणाया सांगितलीं
तिनें बरें हें झणि आठवलें !'

रोगि तपासुन डॉक्टर वदले
छान सुधारलि प्रकृति तुमची
परी आणखीं महिनाभर तरि
कामें बंद करा डोक्याची !'
सद्‌गदितपणें रोगी वदला
'दुसरे कांहीं सूचवा डॉक्टर
असें न्हावि मी ! मग बील कसें
क॰णार बरें चुकतें सत्वर ?'

आई मेली, बाबा मेले
तेव्हां जमले पुष्कळ लोक
'आई बाबासमान आम्ही'
वदले ते 'बा आवर शोक !'
पत्नी मेली तेव्हां जमले
शेजारी पाजारी सारे
परि न एकही बाई वदली
'तुझ्या बायकोसमान मी रे !'

विवाह झाला रजा संपली
कामीं झाला रुजू कारकुन
कचेरींतल्या साहेबानें
त्यास घेतलें बोलावून
फर्मावीलें 'तलाठ्यास द्या
आधीं सारावसुलिचीं बुकें
होता नादामधें कारकुन
झणि उत्तरला 'होय लाडके !'

पाबळ                                                 सौ. सावित्रीदेवी निपुणगे

*

अनुक्रम 3 C-C-C-3 दि. ...
क्रमांक ...

# मूळ स्वभाव जाईल कसा !

सोनाराकडे दागिने टाकले करायला, एक दिवस गेलों आणायला
गोट–पाटल्या, तोडे–वाळे, सोनें चांदी ऐंशी तोळे,
दिलेन मला मोजून–मापून, घेऊन आलों दुकानांतून ॥
तशीच गेल्यें दुसऱ्या दुकानांत, मोजून पाह्यल्ले त्याच्या काटचांत,
कमी भरले एक मासा, मूळ स्वभाव जाईल कसा ? ॥ १ ॥

दर महिन्याच्या जिनसांसाठीं, वही घेऊन आला मोठी,
वाणी यादी लिहून घेई, मोजून मापून आणून देई ॥
आज वाटलें, पाहावी मोजून, डाळ दोन शेर पाहिली मापून,
कमी भरली एक पसा, मूळ स्वभाव जाईल कसा ? ॥ २ ॥
आमच्या गांवचा गोविंदा, मारा–मारी हाण धंदा,
पुढें शिकला झाला पंडित, व्याख्यान त्याचें मधल्या खिडीत,
प्रेक्षक पण ओरडत होते, विजय, शेम घोषित होते ॥
गोविंदा धावत धावत आला, लोकांमध्यें एकदम घुसला,

शेम ओरडणाराला दिला एक ठोसा, मूळ स्वभाव जाईल कसा ?।
आधीं होता गुंड, भूत, मग झाला शांति–दूत ।
सभेंत बोलायला राह्यला उभा, गडबड करूं लागली सभा ॥
संतापला तो शांतिदूत, पुनः अंगीं आलें भूत,
राग भरला नसां–नसां, मूळ स्वभाव जाईल कसा ! ॥ ४ ॥

सासुबाई गेल्या देवाला, पुराणिकांचें पुराण ऐकायला,
काम, क्रोध,, मद, मत्सर घालवावे, घरीं–दारीं प्रेमें रहावें,
मनांत पाप, शंका आणूं नये, कटू वचन बोलूं नये,
पुराणांतलीं वांगीं, पुराणांतरीं ठेवून सासुबाई आल्या घरीं
ओरडूं लागल्या वसा वसा मूळ स्वभाव जाईल कसा ? ॥ ५ ॥

मुंबई

सौ. कमलबाई सोहनी.

## स खे--

सखे तुझ्यास्तव रान द्यावया झालों मी मास्तर
'बी. ए., बी. टी. ' डिग्री मिळविलि नानाविध सत्वर,
तुझ्या हनूनर गुंफियल्या मी काव्य पुष्पमाला
तव प्रीतीस्तव पाकिटांतुनी अर्पियल्या तुजला.

सखे तुझ्यास्तव गाणें गाया बनलीं मी गायक
'गानप्रवीण' पदवी मिळविलि बनुनी पायीक,
नव सारंगीवरी गायिले रागांवर राग
उन्मळूनि ये कंठीं माझ्या नित्यच अनुराग.

सखे, तुझ्यास्तव रंगभूमिवर झालों मीं अॅक्टर
'अभिनयपटु' ही पदवी मिळविलि बनुनीया किंकर,
गत वर्षान्तीं जेव्हां झालें वार्षिक संमेलन
तुझ्याकडे पाहूनि घेतलें हीरोचें काम

मला वाटलें इतुकी सेवा फळास आज आली,
हाय ! परी गे ! 'नको तुम्ही मज' नोटिस ही दिधली !

पुणें

--के- अम्बादास

*

## ल ग्ना नं त र--

( कवि ग. दि. माडगुळकर यांची क्षमा मागून )

लग्नानंतर काय घरामधि राज्य नांदणें प्रीतीचें ?
लग्नानंतर शिकले जातिल काय धडे अन् नीतीचे ?
लग्नानंतर नंदनवन का होइल अवघ्या सदनाचें ?
छे; छे; नाहीं लग्नोत्तर मग प्रयत्न दुसऱ्या लग्नाचे !

पुणें

--के. अम्बादास

# खरी संपत्ति

( राजकवि श्री. यशवन्त यांची क्षमा मागून )

" लइ मानस अमुचा धावीं
अपुल्याला माझी पोर
पर शङ्का येवून थोडी
घेतें हें मन माघार!
पोरीला हवीं 'लिप्स्टीक'
'पावडर' नि साडी गोल !
हा वेन जरा हुंड्याचा
विनवितों द्याल का सैल ?

बोलतो
असूं द्या माफि
'पाचशें' कॉफि
मोजतों रोख
घ्या पिऊन नी बिनधोक !

" ठेवता न पोटीं धाक
पुसलेंत हो लई आवडलें
धनदौलत घ्या देखून
कांहींच नाहीं लपलेलें
व्यवसाय असे जोराचा
सट्टा नि हातभट्टीचा
हङ्गाम सदा चोरींचा
कधि शोक खिसेकापींचा

दररोज
'मनी' येतात
खाण 'शर्टात'
विडोकाडीची "
बसलीच गांठ जन्माची !

सोंसर —शं. चि. काळे,

## छे ! छे ! !

अंधारांतिल चमचमणाऱ्या
तव नेत्रातिल तेज पाहुनीं,
हिऱ्यातील का जादू हरसीं
संशय आत्मा मनांत घुमती !
बाहुपाशीं तुजला घेतां
संशय-आत्मा दडी मारतो,
हिऱ्यांतील कां जादू, छे ! छे ! !
रेडियम मिश्रित काजळ नेत्री ! ! !

—प्रभाकर पाध्ये

## गु ला बी प त्र

उत्सुक होऊनी—पोस्टाचिये
उभा क्षणभरी —भाविक तो !–१
पत्राची पुडकी—किती पडलेली
सर्व न्याहळली—जीवें भावें –२
दूर देशी राही —जिवाची मैत्रीण
लग्नाचे वचन —जिने दिलें – ३
झाली आण भाक–प्रेम विवाहाची
स्वप्नें संसाराचीं—रंगलीं ती – ४
मनोरे सुंदर —हवेंत बांधलें
हाय तें घडलें —एकदाचें – ५
आस होती मनीं –गुलाबी पत्राची
पत्रिका लग्नाची—पडे हातीं – ६

उंब्रज ★ जयसिंग चव्हाण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम 3CC03 इ.जे.ड. ५१०८
क्रमांक ....१६८० नों दि. २०१९

# पृथ्वी आणि परमेश्वर

पाहिली प्रभूनें सृष्टि सती रोगातीं,
क्षीणता तिची अन् जीव तिचा मावळता.
लक्तरें तिचीं, अन् असंख्य पोरें भंवतीं,
मज भूक लागली एकच गिल्ला करिती !
तें बघुन प्रभूला गहिवर दाटुन आला,
अन् आवेगानें आंत उठुनिया गेला.
धुंडिलें तयानें सारें घर तें तेव्हां
परि हंडी मडकीं सर्व पालथीं होतीं !
मग खूपच त्याची येत उसळुनी माया
तो सर्व मुलांना घेउनि बसे रडाया !
हें बघुन तेधवा हसली पृथ्वी त्याला
अन् विकटरवानें वदली कटुवचना या–
' जर केलें असतें संततिनियमन नाथा !
परि आतां त्याचें काय ? कशाला रडतां ? '

पुणें

बापू पाठक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
रा. क्र. २०५४९
ग्रंथ शाखा (स्थल

## आम्ही प्रसिद्ध केलेले काव्यसंग्रह

| | | |
|---|---|---|
| काव्यवाहिनी खंड १ ला | (संपादक रा. श्री. जोग व कुसुमाग्रज) | ३–०० |
| काव्यवाहिनी खंड २ रा | (संपादक रा. श्री. जोग व कुसुमाग्रज) | ३–०० |
| स्वप्नलहरी | माधव ज्युलियन (पदक गिरीश) | ३–०० |
| पाणपोई | यशवन्त | ३–०० |
| यशोगन्ध | यशवन्त | ३–०० |
| बन्दीशाळा | यशवन्त | ३–०० |
| जयमङ्गला | यशवन्त | २–०० |
| सदासरिता | (संपादिका मालती किर्लोस्कर) | ३–०० |
| मेंदी | इंदिरा संत | २–०० |
| नजराणा | वा. ज्या. देशपांडे | २–०० |
| मेघमाला | अ. र. शिरवाडकर | २–०० |
| धुवाधार | बाबुलनाथ | १० |
| युगायुगाचे सहप्रवासी | मनमोहन | ०० |
| वर्षा | शांता शेळके | ५० |

REFBK-0010575
REFBK-0010575

### कॉन्टीनेन्टल प्रकाशन
टिळक रोड, पुणें २.